दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
13SEP2025

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा, श्री शिवाजी विद्यालयात जनजागृती

बीड, दि.१२ (लोकाशा न्युज) :- एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी आणि क्रिक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत शहरातील श्री शिवाजी विद्यालय व सौ.के.एस.के महाविद्यालयात सायबर सुरक्षा विषयी जनजागृतीपर कार्यक्रम बुधवारी घेण्यात आला. सध्याच्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचा वाढता धोका लक्षात घेता विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षिततेची सखोल माहिती देणे आणि त्यांना डिजिटल सशक्त साक्षर नागरिक बनवणे हे आहे. त्या अनुषंगाने या मोहिमेत एमआयटी कॉलेजचे विद्यार्थी मयूर रामेश्वर चव्हाण यांनी 'तुलशी थरीळी' म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यांनी बीडमधील श्री शिवाजी विद्यालयात मंगळवारी व शहरातील सौ. के.एस. के. महाविद्यालयात बुधवारी

सायबर गुन्ह्याबाबत जागृत केले. मयूर चव्हाण यांनी शालेय विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग ट्रॅप्सपासून कसे वाचावे आणि मजबूत पासवर्ड बनवण्याचे तंत्र याबाबत व्याख्यानात्मक मार्गदर्शन केले. त्यांच्या संवादातून सायबर सुरक्षिततेविषयी जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न प्रभावीपणे करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शंकाचेही निरसन त्यांनी व्यवस्थितपणे केले. ही कार्यशाळा फक्त सायबर गुन्ह्यांविषयी माहिती पुरवून थांबत नाही, तर विद्यार्थी स्वयंपूर्णपणे सुरक्षित डिजिटल जीवन जगण्याची जबाबदारी स्वीकारू शकतील, असा संदेश देते. या मोहिमेसाठी प्रा.अमित ताळे (एमआयटी कॉलेज) व अजय शिरके (क्रिक हील फाउंडेशन) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आणि क्रिक हील फाउंडेशनच्या संयुक्त प्रयत्नातून सायबर जागरूकतेच्या दिशेने एक नवीन प्रवास सुरू झाला आहे. या उपक्रमाचे श्री शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, उप मुख्याध्यापक त्र्यंबक मातकर, उप मुख्याध्यापक रमेश सुपेकर, पर्यवेक्षक डी.एन.कर्डिले, गिरीश चाळक यांनी कौतुक केले आहे.

PRINT SAVE NEWS